# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २०/०४/२०२३

## ➢ जबरी चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे राजापेठ ३७४/२०२३ कलम ३९२ भादंवी | अमरावती | दि. १९.०४.२०२३ चे १३.१५ वा.<br><br>दि. १९.०४.२०२३ चे १६.४६ वा. | एक महिला | अनोळखी इसम वय ३० वर्ष | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हया पायी भावाचे घरी जात असंतांना यातील नमुद अज्ञात आरोपी हिरो होन्डा गाडीने फिर्यादी जवळ आला व फिर्यादीस म्हणाला की तुम्हाला कोठे जायचे आहे चला मी पोहचुन देतो मी तीकडे जात आहे तर मी त्यांना म्हटले की, मी तुमच्या सोबत येत नाही व फिर्यादी ॲटोने बीएसएनएल ऑफीसमध्ये गेल्या फिर्यादी पुन्हा परत पायी तेथुनच परत जाता असतांना पुन्हा आरोपी फिर्यादीजवळ आला व तिच्या हातातील पाउच सारखी असलेली पर्स ज्यामध्ये काळया रंगाचा विवो कंपनीचा मोबाईल १५०००/- रु व रोख ३००/- रु असे होते ति पर्स जबरीने हिसकावुन घेवुन दुचाकीसह पळुन गेला. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ अपघात :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | नांदगाव पेठ अप क्र १४९/२३ कलम २७९,३३७, ३३८ भादवि | लोटस मंगल कार्यालय समोर रोडवर | दि. १८/०४/२३ चे २१/१० वा<br>दि. १९/०४/२३ २०/५५ वा | सुभाष गोकुळ प्रसाद मोर्य वय ५४ वर्ष रा लक्ष्मी नगर अमरावती | वाहन क्र MH 04 D W 0941 चा चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फि हे घरी हजर असता भाचा नामे सचीन मोराई याचा फोन आला की रोहीत मोर्य याचा रिंगरोड येथे अपघात झाला असुन तो पंजावराव देशमुख दवाखाना अमरावती येथे भरती आहे. त्याच्या गळयाला , डोक्याला व ऊजव्या पायाला मार लागला आहे. त्याचा ज्या गाडीने अपघात झाला त्याच्या गाडीचा क्र एम एच ३१ एफ एम ८६५० असा असुन तो घराकडे त्याच्या मैत्रीणीसोबत जात असतांना कठोरा नाका रिंगरोडने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे गाडी चालक याने त्याची पांढ-या रंगाची होन्डाई गाडी क्र MH 04 D W 0941 च्या चालकाने त्याची गाडी ओव्हरटेक करुन फि यांचा नातु रोहीत मोर्य याच्या गाडीला समोर ठोस मारुन जख्मी केले असा फि च्या जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **ईतर :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ३ | पो स्टे गाडगे नगर अप क्र ५५३/२०२३ कलम १३६ भाविका | १०० के व्ही रोहीत्र जिल्हा क्रीडा संकुल अमरावती | दि ०३-०४-२३ ते ०४.०४.२०२३ चे रात्री दरम्यान<br>दि १९-०४-२३ चे २०-०९ वा. | श्री नवनीत रामदासजी सावरकर वय ४१ वर्ष रा सहाय्यक अभियंता जुना पावर हाउस वितरण केंद्र अमरावती | अज्ञात | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फीर्यादी पो स्टे ला येवून लेखी रीपोर्ट दिला की दि ०३.०१.२०२३ ते ०४.०४.२०२३ रात्री च्या दरम्यान १०० के व्ही रोहीत्र जिल्हा संकुल अमरावती मधील कोणीतरी अज्ञात चोरट्र्याने ऑईल ची चोरी करण्यात आल्यामुळे सदर रोहीत्र हे बंद पडले. सदर रोहीत बदलविण्यात आले असून सदर घटनेमुळे म रा वि वि कंपनीचे १५० लिटर ऑईल चोरीला गेले असून त्याची अं कि ११२५०/- रु चे नुकसान झाले आहे अशा लेखी रीर्पोटवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ५ | पोस्टे वलगाव 138/2023 कलम १४३,१८६, २९४ भादवि. | आठवडी बाजार शिराऴ | दि.१९/०४/२०२३ चे १६/३० वा.<br>माहीती दि.१९/०४/२०२३ चे १९/००<br>दाखल दि.१९/०४/२०२३ चे २३/४३ वा. | पांडुरंग गणपतराव गोडेकर वय ५७ वर्ष ग्राम विकास अधिकारी ग्राम पं.च .शिराऴा.रा. पोसे् टाऊन शिप लाईन ०२ इमारत क्र.४८० | १) विनोद वासुदेवरा नागे वय ५२ वर्ष<br>२) विकास सुभाष नागे वय ३२ वर्ष<br>३) मारोतराव केशव नागे वय ३५ वर्ष<br>४) सुभाष केशव नागे वय ३५ वर्ष<br>५) निखिल सुभाष नागे वय ३६ वर्ष सर्व रा.ग्राम शिराऴा.ता.जि.अम. | हकिकत आशा प्रकारे आहे. कि दि.१९/०४/२०२३ रोजी दुपारी १६/३० वा.दरम्यान आठवडी बाजार असल्याने मी ग्राम पंचायत चे कर्मचारी न.०१ योगेन्द्र हिम्मतराव तायडे वय ३८ वर्ष ,प्रविन भागवत वय ३६ वर्ष ,यांचे सोबत विनोद वासुदेवराव नागे यांने ज्या ठीकानी आठवडी बाजार च्या जागेत विटा व रेती टाकली होती.त्या घटनास्थऴी गेलो असता. आम्हाला रेती व विटा त्या ठीकानी दिसुन आल्यावरुन मी स्वता विनोद वासुदेव नागे वय ५२ वर्ष याला विटा व रेती उचलुन घे असे म्हटले असता. विनोद वासुदेवरा नागे ,विकास सुभाष नागे,मारोतराव केशव नागे,सुभाष केशव नागे ,निखील सुभाष नागे.सर्व रा.ग्राम शिराऴा ता.जि.अमरावती.यांनी मला अश्वील शिवीगाऴ केली.व ते सर्व माझे अंगावर आले व घटनास्थऴी अलेल्या लोकांनी भांडन सोडविले व त्यानी रेती व विटा उचण्यास नकार दिला.व मला वर नमुद लोकांनी अश्विल शिवीगाऴ केली तेव्हा मी माझे कर्तव्यावर हजर होतो व एकंदरीत लोकांनी शासकीय कामात अडथळा निर्माण केला अशा फिर्यादिचे जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

## ➢ जुगार रेड :-

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| २ | पोस्टे बडनेरा अमरावती शहर | अप.क्र.२८५/२०२३ कलम १२(अ) म.जु.का. | यवतमाळ टी पाईन्ट बडनेरा | दि.१९.०४.२०२३ चे २१.०० वा. | दि. १९.०४.२०२३ चे २३.४५ वा. | सरतर्फे पोहेका शैलेश मोरे ब.नं.१०२९ पोस्टे बडनेरा | विनोद तुळशीराम जाधव वय- ४६ वर्ष रा. माळीपुरा जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन नगदी २३०/- रु. ०१ ते १० आकड्याच्या वरली मटका जुगाराच्या चिठ्या व एक बॉलपेन कि.अं.०५/- रु. असा एकुण २३५/- रु. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | नांदगाव पेठ | १४८/२३ कलम १२ (अ) महा राष्ट्र जुगारबंदी कायदा सहकलम १०९ भादवि | माहेश्वरी ऊपहार गृह जवळ रोड लगत मोकळ्या जागेत रहाटगाव | दि. १९/०४/२३ चे १४/०० वा | दि. १९/०४/२३ चे १६/१८ वा | सरतर्फ नापोका दिपक महादेवराव सुंदरकर ब न १४५६ गुन्हे शाखा अमरावती शहर | १) राहुल दिलीप मोहोड वय ३४ वर्ष रा कवठा जठेश्वर ता नांदगाव खंडेश्वर ह मु मिलींद नगर रहाटगाव अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फि यांची पो स्टाँपसह पो स्टे ह्ददीत पेट्रोलींग असातंना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी एक ईसम १ ते १० आकड्यावर वरली मटक्याच्या चिठ्या लिहीत आहे. वरुन रेड केल ।असता चिठ्या लावणारा ईसम जागीच मिळुन आला त्याला पंचासमक्ष ताब्यात घेऊन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव १) राहुल दिलीप मोहोड वय ३४ वर्ष रा कवठा जठेश्वर ता नांदगाव खंडेश्वर ह मु मिलींद नगर रहाटगाव अमरावती असे सांगितले. त्याच्या ताब्यातुन १) नगदी ११३६ रु २) एक बॉल पेन कि १० रु ३) १ ते १० आकडे लिहीलेल्यौ वरली मटक्याच्या ३ चिठ्या ४) एक लाव्हा कंपनाची किपँड असलेला काळया रंगाचा मोबाईल कि १००० रु असा एकुण २१४० रु चा माल मिळुन आला. त्याला जुगारबाबत माहीती विचारली असता त्याने सांगितले की सदर व्यवसाय सुमित मोहोड रा रहाटगाव याचा असुन ३०० रु प्रती रोजाप्रमाणे काम करीत आहे. अशा फि च्या लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |